( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र.पोमसं/८/६८०/लघुलेखक पदोन्नती/१०२/२०२०/सीई-३१८ मुंबई, दि.२८/१२/२०२०.

-: आदेश :-

*****

पोलीस महासंचालकांच्या शहर लिपिक संवर्गातील खालील नमूद लघुटंकलेखक (गट-क) यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे नियुक्तीच्या ठिकाणी त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निम्नश्रेणी लघुलेखक (अराजपत्रित, गट-ब) (वेतनस्तर एस-१४:३८६००-१२२८००/-) पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | सध्याचे नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवर नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | श्री. अजित तुळशीदास कदम | आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय | पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) | संवर्गातील रिक्त पदात |
| २. | श्री. प्रशांत मधुकर कर्णेकर | विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई | विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई | संवर्गातील रिक्त पदात |

२. उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेल्या पदोन्नती ह्या शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि.२९/१२/२०१७ अन्वये देण्यात आलेल्या आदेशास अनुसरुन सेवाज्येष्ठतेनुसार व विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

३. उपरोक्त प्रमाणे पदोन्नती/बदली झालेल्या कर्मचारी यांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणांची यादी पदमोचक लघुलेखक कर्मचाऱ्याकडे किंवा संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचेकडे न चुकता द्यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

४. उपरोक्त पदोन्नत निम्नश्रेणी लघुलेखक यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पीअेच्वाय/१०८२/सीआर/११००(२)/अेसईआर-३, दि.०६/११/१९८४ नुसार पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम ११(१)(अ) अन्वये केली जाईल यांची त्यांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

(सु.कु.जायसवाल)
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

श्री. अजित तुळशीदास कदम, लघुटंकलेखक
(मार्फत :- आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई)
श्री. प्रशांत मधुकर कर्णेकर, लघुटंकलेखक

प्रत सस्नेह अग्रेषित:-

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पुर्व), मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. आयुक्तांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधित पदोन्नत कर्मचाऱ्यांना उक्त आदेशातील परिच्छेद क्र.३ मधील नमूद बाबींची पूर्तता करुनच बदली कर्मचारी हजर होण्याची प्रतीक्षा न करता पदोन्नतीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता त्यांच्या कार्यालयातून सत्वर कार्यमुक्त करुन तसे या कार्यालयास कळवावे.

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, ३२ व ३६.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई

२ पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे एक महिन्यासाठी उपलब्ध करून द्यावेत.

( ब्रिजेश सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.